सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**Dy.Commissioner of Police, Zone 2,**
Sir J J Raod, Nagpada, Mumbai-40000 8.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, मुंबई.
सर जे.जे.रोड,नागपाडा, मुंबई-४००००८.

Tel :- 022 23073663
Email ID – dcpzone2-mum@mahapolice.gov.in

परवाना जा.क्र. ०३ /पोउआ/परि-२/टे-२/२०२४ दिनांक ०१/ ०२ /२०२४

प्रति,

श्री. सुहेल अब्बासी,
प्रतिनिधी, द हमसफर ट्रस्ट,
मंथन प्लाझा, ३ रा माळा, नेहरू रोड,
वाकोला, सांताक्रुझ (पु),
मुंबई ४०००५५

विषय :- दिनांक ०३/०२/२०२४ रोजी लैंगिक अल्पसंख्यकांचे आरोग्य व मानवी हक्कांबद्दल जनजागृती पदयात्रेकरीता परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- आपले दिनांक १८/०१/२०२४ रोजीचे पत्र

आपल्या दिनांक १८/०१/२०२४ रोजीच्या प्राप्त अर्जास अनुसरून मी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -२, मुंबई कलम ३६, ३७ सह कलम ६ च्या पोट कलम (२) व ६८ मुंबई पोलीस अधिनियम १९५१ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये आपणास खालील अटी व वाहतूक शाखेच्या पुर्व परवागीच्या अधिन राहून दिनांक ०३/०२/२०२४ रोजी डॉ. दा. भ. मार्ग व गावदेवी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात नमुद ठिकाणी जनजागृती पदयात्रेकरीता परवानगी देत आहे.

<u>**जनजागृती पदयात्रा मार्ग**</u> :- ऑगस्ट क्रांती मैदान-नाना चौक-ग्रॅन्ट रोड स्टेशन ब्रिज- लमिग्टंन रोड-डॉ. दा. भ. मार्ग- वि. प. मार्ग- ऑपेरा हाऊस- केनेडी ब्रिज-नाना चौक-ऑगस्ट क्रांती मैदान याच मार्गाने पदयात्रा काढावी

१) जनजागृती पदयात्रा ही दिनांक ०३/०२/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वा. ते सायंकाळी ०५.३० वा. दरम्यान अर्जात नमुद केल्याप्रमाणे ठरलेल्या ठिकाणी आणि ठरलेल्या वेळेतच पुर्ण करावी.

२) सदर पदयात्रा ही वर नमुद केलेल्या मार्गानेच काढण्यात यावी.

३) पदयात्रेकरीता वाहतुक विभाग व आवश्यक त्या प्राधिकरणाकडून परवानगी घेणे आवश्यक आहे.

**४) पदयात्रेमध्ये सहभागी होणाऱ्यांनी संपूर्ण कालावधीत दोन समाजामध्ये तेढ निर्माण होईल असे आक्षेपार्ह अथवा भावना भडकवणारे वक्तव्य / घोषणाबाजी करू नये किंवा आक्षेपार्ह फलक प्रदर्शित करू नयेत ज्यामुळे उपद्रव निर्माण होईल.**

५) पदयात्रा कालावधीत हत्ती, घोडे, उंट, व इतर प्राणी तसेच शस्त्र किंवा हत्यारे उदा.तलवार, लाठी इ. जवळ बाळगण्यास, प्रदर्शन करण्यास प्रतिबंध आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही प्रकारच्या स्फोटक पदार्थाचा वापर तसेच फटाक्यांची आतिषबाजी करण्यास प्रतिबंध आहे.

६) पदयात्रेमध्ये सहभागी असलेल्यांवर नियंत्रण, मार्गदर्शन व कोणाला कोणत्याही प्रकारची दुखापत झाली तर त्याबाबतची सर्व जबाबदारी ही आयोजकाची राहील.

७) पदयात्रेमध्ये कोणत्याही खाजगी जाहिरातींचे अथवा कंपनीचे बॅनर्स लावण्यात येऊ नयेत.

८) पदयात्रेदरम्यान वाहतुकीस, रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. पदयात्रेमध्ये महत्वाचे व्यक्ती तसेच अतिमहत्वाची व्यक्ती उपस्थित राहणार असल्यास याबाबत पोलीस प्रशासनास अवगत करण्यात यावे.

९) पदयात्रेमध्ये सहभागी होणाऱ्यांनी सदर कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीत कोणत्याही प्रकारच्या राजकीय धार्मिक घोषणा देऊ नयेत. सदर कार्यक्रम फुटपाथवरुन नेऊ नये तसेच रस्त्यावर मध्येच थांबवु नये, किंवा फुटपाथवर थांबवु नये. सदर कार्यक्रम वर नमूद वेळेवर सुरु करून समाप्त करावी. तसेच परवानगी दिलेल्या मार्गावरुनच काढण्यात यावी.

१०) पदयात्रेमध्ये धार्मिक व सामाजिक भावना दुखावतील असे देखावे अथवा लिखान असता कामा नये.

११) पदयात्रेमध्ये वापरण्यात येणारे वाहन सुस्थितीत असल्याची, वाहन चालकाकडे उचित वाहन परवाना असल्याची, वाहन चालकाने मादक पदार्थाचे सेवन केले नसल्याची खातरजमा करावी व त्यांची पुर्तता करण्याची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील.

१२) पदयात्रेदरम्यान महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये प्रतिबंध घालण्यात आलेल्या सुचनांचे पालन करावे.

१३) मा.उच्च न्यायालय, मुंबई जनहित याचीका क्र. १७३/२०१०, श्री.महेश वि. बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन या न्यायालयीन प्रकरणी ध्वनीप्रदुषणाबाबत दिलेल्या मार्गदर्शक तत्वान्वये महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१, फौ.दं.प्र.सं.कलम १३३ मधील कोणतेही गैरकायदेशीर कृत्य ज्यामध्ये सामाजीक अशांततेचा समावेश आहे याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१४) ध्वनीप्रदुषण (विनियमन व नियंत्रण) अधिनियम - २००० अन्वये शांतता क्षेत्रात व शांतता क्षेत्राच्या १०० मीटर परिसरात डिजे/ ध्वनिक्षेपक/लाउडस्पिकर लावण्यास, वापरास व कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजविण्यास मनाई आहे. सदर आदेशाचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता आयोजकांनी घ्यावी.

१५) पोलीसांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ६८ प्रमाणे सुचना देण्याचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे कर्तव्यावरील पोलीस अधिकारी व अमंलदार यांच्या सर्व सुचनांचे, आदेशाचे पालन करावे.

१६) पदयात्रेमध्ये चालत्या वाहनांवर ध्वनिक्षेपक लावण्यात येवू नये. ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यापुर्वी ध्वनीक्षेपक परवानगी प्राप्त करावी. तसेच कायदा व सुव्यवस्थेस बाधा व प्रचलित नियमांचा भंग होणार नाही, याची दक्षता आयोजकांनी घ्यावी. अन्यथा त्यास ते स्वत: जाबाबदार राहतील.

१७) पदयात्रेमध्ये वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर, बोनेट, छत, बंपर इ. वर कोणीही व्यक्ती, लहान मुले बसणार नाहीत तसेच बाजुच्या फुटरेस्टवर कोणीही लटकणार नाही तसेच वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त लोक बसणार नाही याची दक्षता घ्यावी.

१८) पदयात्रेमध्ये वरील सर्व अटीचे तंतोतंत पालन होईल यांची जबाबदारी आपण स्वत: व इतर जबाबदार पदाधिकारी याची राहील.

१९) योग्य प्रमाणात महिला व पुरुष सिक्युरीटी गार्डची व्यवस्था करावी. महिला व पुरुषांच्या प्रवेश मार्गावर तपासण्यासाठी वेगवेगळे कॅबीन उपलब्ध करावे.

२०) पदयात्रेमध्ये कोविड-१९ या आजाराचे अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तीचे उल्लंघन होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

२१) महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (३) अन्वये तत्कालिन कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती पाहून तसेच अर्जदार यांचे कार्यक्रमामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास कार्यक्रमास देण्यात आलेली परवानगी कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार पोलीसांकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

वरील अटींचे तंतोतंत पालन जनजागृती पदयात्रेतील सर्वजन करतील याची जबाबदारी खालील व्यक्तीवर राहिल.

**श्री. सुहेल अब्बासी, प्रतिनिधी**

हा आदेश दिनांक ०७ /०२/२०२४ रोजी दिला असून कृपया पोच द्यावी या आदेशाचे उल्लंघन केल्यास मुबई पोलीस कायदा १९५१ च्या कलम १३४, व १३५ प्रमाणे कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

(डॉ.मोहित कुमार गर्ग)
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ-२,मुंबई.

**टिप :- सदरची परवानगी ही फक्त पदयात्रा काढण्याकरीता देण्यात आली आहे. पदयात्रेदरम्यान लाऊडस्पिकर, वाद्य वाजविणेकरीता स्वतंत्र परवानगी घ्यावी.**

प्रत :-
१) सहाय्यक पोलीस आयुक्त, गिरगांव व गांवदेवी विभाग, मुंबई.
२) वरिष्ठ पोलीस निरिक्षक, डॉ. दा. भ. मार्ग व गावदेवी पोलीस ठाणे, मुंबई.

**Mumbai Queer Pride March 2024**

**Rough English Translation of Mumbai Police Law & Order Permission Rules & Regulations**

Route of the march:
August Kranti Maidan – Nana Chowk – Grant Road Station Bridge – Lamington Road (D B Road) – S V P Road – Kennedy Bridge – Nana Chowk – August Kranti Maidan.

1. Pride march will be on 03rd Feb 2024, 3 PM to 5.30 PM and to be completed within the stipulated time.

2. Pride march should be on the same route stated above.

3. Traffic permissions and other relevant permissions to be sought.

4. Participants of the march should not make statements or slogans, or display objectionable material that creates a rift between sections of society or infuriates the sentiment of people.

5. Elephants, horses, camels or any other animals and/or weapons are prohibited in the march. Explosives and fire crackers are also prohibited in the march.

6. Guidance and safety of the participants is the responsibility of the organizers.

7. Private companies should not advertise their banners in the march.

8. The march should not hinder traffic or pedestrian movement. Potential participation of VIP, celebrities or famous people should be informed in advance to the Police.

9. Participants should not make religious or political slogans. Participants of the march shall not march on the footpath, wait on roads or on footpaths.

10. The march shall not contain display and/or text that offend religious or political sentiments.

11. People who have consumed alcohol should not participate in the march.

12. March should follow restrictions vide Maharashtra Police Act Sec 37(1)(3).

13. In response to PIL No. 173/2010 (Mr. Mahesh V. Bedekar-vs-Government of Maharashtra) at the Mumbai High Court , Maharashtra Police Act 1951, CrPC Sec 133 stipulates regulations for ensuring silence & social peace. There regulations shall not be violated.

14. In accordance with Noise Pollution (Prevention & Control) Rules 2000, any equipment producing or amplifying sound is prohibited in Silent Zone and/or 100 meters surrounding Silent Zone. There rules shall not be violated.

15. The Maharashtra Police Act Sec 68 authorizes all Police personnel to give instructions. Accordingly, all instructions of the Police personnel on duty must be followed.

16. No amplifiers or speakers should be installed on vehicles.

17. Children and/or infants should not occupy bonnet, roof, bumper, etc. of vehicles. People should not be leaning off footrests of vehicles. Vehicles, if allowed, should not carry more than allowed number of persons.

18. Strict adherence to Laws and Rules & Regulations in the sole responsibility of the organizers.

19. Sufficient number of male and female security personnel should be deployed during the march.

20. Directives given by the State Government & Municipal Corporation in accordance with Covid-19 shall be followed at all times.

21. As per the Maharashtra Police Act Sec 37(3), Police reserves the right to revoke the permissions at any time without prior notice, if any Law & Order situation is found to have occurred due to the program organized by the applicant.

22. The above order has been passed on 01 Feb 2024 and violation shall attract penal action as per Maharashtra Police Act 1951, Sec 134 and Sec 135.

| | | | |
|---|---|---|---|
| | | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | |
| थेट दूरध्वनी :- ०२२२४९४५३३९<br>EXT १२०<br>ई-मेल:- piadmn.traffic@mahapolice.gov.in | | | पोलीस सह आयुक्त, वाहतुक, मुंबई<br>यांचे कार्यालय,<br>सर पोचखानवाला रोड,वरळी,<br>मुंबई- ४०००३० |

OW :- 86 /PI(Adm)/Traffic/2024 Date :- 11 /01/2024

प्रति,

व.पो.नि./ प्र.पो.नि.
ताडदेव / डी.बी.मार्ग वाहतुक विभाग,
मुंबई.

विषय:- दिनांक ०३/०२/२०२४ रोजी लैंगिक अल्पसंख्यकांचे आरोग्य व मानवी हक्कांबद्दल जनजागृती पदयात्रा काढणेकरिता वाहतूक शाखेकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत.

संदर्भ:- आ.क्र. १०७/प्रपोनि/प्रशासन/वाहतुक/२३, दिनांक ०८/०१/२०२४

अर्जदार श्री. सोहील अब्बासी, प्रतिनिधी - द हमसफर ट्रस्ट, कार्यालय पत्ता- मथंन प्लाझा, ३ रा माळा, नेहरू रोड, वाकोला, सांताक्रुल,पुर्व, मुंबई यांचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला असुन त्यामध्ये त्यांनी दिनांक ०३/०२/२०२४ रोजी लैंगिक अल्पसंख्यकांचे आरोग्य व मानवी हक्कांबद्दल जनजागृती पदयात्रा हा कार्यक्रम आयोजित करण्याकरिता वाहतुक विभागाचे ना- हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

अर्जदार यांच्या अर्जाच्या अनुषंगाने जनजागृती पदयात्रा काढणेकरिता मा. पोलीस सह आयुक्त, वाहतूक, मुंबई यांनी दिनांक १०/०१/२०२४ रोजी योग्य त्या अटी व शर्तीच्या अधिन राहून नमूद " जनजागृती पदयात्रेच्या "आयोजनासाठी ना-हरकत परवानगी देण्यास मान्यता दिली आहे.

पदयात्रेचा मार्ग :- ऑगस्ट क्रांती मैदानाबाहेरून सुरुवात होवुन -पुर्वेकडे प्रस्थान - नाना चौक - फ्रेयर ब्रिज (मो. शौकत अली मार्ग) पुढे उजवीकडे वळण घेवुन लॅमिंग्टन रोड (डी.बी.मार्ग ) - गजानन वर्तक चौक उजवीकडे वळण घेवुन - सरदार वल्लभभाई पटेल मार्ग - पुलस्कर चौक (ऑपेरा हाऊस ) कडुन उजवे वळण घेवुन केनडी ब्रिज - नाना चौकात डावीकडे वळण घेवुन पुढे ऑगस्ट क्रांती मैदाना बाहेर समाप्त.

पदयात्रेचा दिनांक व वेळ :- दिनांक ०३/०२/२०२४ रोजी दुपारी १५.०० वा.ते सायकांळी १८.०० वाजताचे दरम्यान

-: अटी व शर्ती :-

| | |
|---|---|
| • | सदरचे ना-हरकत पत्र हे वर नमुद दिनांक-वेळ व मार्गाकरिताच मर्यादित राहील याची नोंद घ्यावी. |
| • | पदयात्रा ही मार्गक्रमणा दरम्यान वाहतूक व पादचाऱ्यास कोणत्याही प्रकारचा अडथळा होता कामा नये व मार्गक्रमण हे सर्वसाधारण नियमित वाहतूक प्रवाहामधूनच करण्यात यावे. |
| • | मा. उच्च न्यायालय यांनी CIVIL APPLICATION NO 124 Of 2014 in CIVIL APPLICATION NO 226X of 2013 in x PIL No 173 of 2010 Vide order dated 13/3/2015, 24/06/2015 and 17/07/2015 and 03/08/2015 अन्वये दिलेल्या मार्गदर्शन पर सुचना व आदेशाचे पालन झाले पाहिजे. मा. न्यायालयाचे आदेशाचे अवमान झाल्यास अर्जदार सर्वस्वी जाबाबदार राहतील याची नोंद घ्यावी. |
| • | पदयात्रा मार्गक्रमणाकरीता कोणताही रस्ता रहदारीस बंद केला जाणार नाही. |
| • | पदयात्रा कायदेशीर परवानगी शिवाय ध्वनिक्षेपकाचा वापर करू नये. |

| | |
|---|---|
| • | पदयात्रा ही रस्त्याच्या डाव्या बाजूने काढण्यात यावी. मिरवणुक मार्गावर स्वयंसेवक नेमण्यात यावेत जेणेकरून वाहतुकीस कोणताही अडथळा होणार नाही. |
| • | सदर पदयात्रा मार्गक्रमणा दरम्यान फटाके वाजवू नयेत व कोणत्याही प्रकारचे ध्वनीप्रदुषण व वायुप्रदुषण होणार नाही याची दक्षता घ्यावी. अर्जदार यांनी पोलीसांचे पूर्व परवानगीशिवाय मिरवणुकीच्या मार्गामध्ये बदल करू नये. |
| • | पदयात्रेला देण्यात येणारी परवानगी सदर कार्यक्रमाच्या अर्जात दिलेल्या व स्थळा पुरतीच मर्यादीत राहिल. |
| • | आयोजनकांनी महानगर पालिका/स्थानिक पोलीस ठाणे, पोलीस आयुक्तालयातील संबंधित पोलीस कार्यालये, इतर संबंधित शासकीय व निमशासकीय कार्यालये, महामंडळे यांचेकडून आवश्यक ती परवानगी पत्रे प्राप्त करावी. |
| • | पदयात्रा मार्गक्रमणावेळी कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या सर्व कायदेशीर सुचनांचे परिपूर्ण पालन करावे. |
| • | वाहतुकीचा ओघ लक्षात घेऊन सदरची परवानगी देण्यात आलेली पुढील वर्षाकरीता सदरची परवानगी ग्राह्य धरली जाणार नाही. |
| • | कोविडी-१९ या विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुर्नवसन, आरोग्य पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधीत महापालिका, पोलीस स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील |
| • | वर नमूद शर्ती व अटी यापैकी कोणत्याही शर्तीचा/अटीचा आयोजकांकडुन व त्यांचे प्रतिनिधी यांच्याकडून उल्लघंन झाल्यास सदरचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल. |

**मा. पोलीस सह आयुक्त, वाहतुक, मुंबई**
**यांच्या मान्यतेने**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
वाहतूक नियंत्रण शाखा

11/1/24

( देवेंद्र राठोड )
प्रभारी पोलीस निरीक्षक (प्रशासन)
वाहतूक पोलीस मुख्यालय, मुंबई

<u>माहितीकरीता</u> -

१) मा. अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, मुंबई.
२) मा. पोलीस उप-आयुक्त,दक्षिण, वाहतुक, मुंबई
३) मा. सहाय्यक पोलीस आयुक्त , दक्षिण - मध्य परिक्षेत्र मुंबई.
४) प्रशासकिय अधिकारी, कक्ष-११ (बंदोबस्त शाखा ), मुंबई.

**<u>प्रत कार्यवाही करीता</u> :-** प्रपोनि/ वपोनि -ताडदेव, डी.बी.मार्ग वाहतुक विभाग,प्र.पो.नि.वाहतूक नियंत्रण कक्ष, मुंबई.

अर्जदार : - श्री. सोहील अब्बासी, प्रतिनिधी - **द हमसफर ट्रस्ट, कार्यालय पत्ता- मथंन प्लाझा, ३ रा माळा,** नेहरू रोड, वाकोला, सांताक्रुल,पुर्व, मुंबई